GR-for Metro 32 2015

**मुंबई मेट्रो लाईन - २ प्रकल्प-**
**दहिसर-चारकोप-वांद्रे-मानखुर्द मेट्रो मार्गाचा टप्पा १ दहिसर (पू) - डी.एन.नगर या उन्नत मेट्रो रेल्वे प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यास राज्य शासनाची मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३१५/प्र.क्र.११३/नवि-७,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १७ ऑक्टोबर, २०१५.

**संदर्भ :** (१) शासन निर्णय क्रमांक MRD-३३०५/८०१/CR१२६/UD-७ dated ४th May, २००६.
(२) शासन निर्णय क्रमांक MRD-३३०६/२२९४/CR७२/UD-७ dated १४th November, २००६.
(३) शासन निर्णय क्रमांक MRD-३३०८/CR१४८/UD-७ dated ३१st July, २००९.

**प्रस्तावना :**

मुंबई महानगर प्रदेशातील वाहतूक व परिवहन व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने १ ते २ कि.मी. अंतरावर जलद सार्वजनिक परिवहन व्यवस्था उपलब्ध करणे शक्य व्हावे म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने १४६.५ कि.मी. लांबीच्या ९ मेट्रो मार्गिकांचा समावेश असलेला मेट्रो रेल्वे प्रकल्पाचा बृहत आराखडा (Master Plan) तयार केला आहे. त्यापैकी मेट्रो लाईन-१ मार्गिका: वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर (उन्नत मार्गिका), लांबी ११.४० की.मी. ही बांधा, वापरा, स्वामित्व घ्या व हस्तांतरीत करा या तत्वावर बांधकाम पूर्ण करुन दिनांक ०८ जून, २०१४ पासून प्रवासी सेवेस खुली करण्यात आली आहे. मुंबई मेट्रो मार्ग -३ कुलाबा-वांद्रे-सिप्झ (लांबी ३३.५ कि.मी.) हा पूर्णत: भुयारी असलेला मार्ग महाराष्ट्र शासन व केंद्र शासन यांनी मान्यता दिली असून त्यांचे समभाग तसेच जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्था (JICA) यांच्या अर्थसहाय्याने मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. (MMRCL) यांच्यामार्फत राबविण्यात येत असुन, सदर प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.

मुंबई मेट्रो रेल्वे मार्ग-२ चारकोप - वांद्रे - मानखुर्द ( लांबी ३१.८७१ कि.मी. उन्नत) हा प्रकल्प सुरवातीस सार्वजनिक खाजगी सहभागाने (PPP) बांधा वापरा व हस्तांतरीत करा (BOT) या तत्वावर मुं.म.प्र.वि. प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत होता तथापि, या पर्यावरण विभागाच्या अटी व अन्य कारणामुळे सदर प्रकल्पाची पुढे प्रगती न झाल्याने सदर प्रकल्पाचे सवलतकार मुंबई मेट्रो ट्रान्सपोर्ट प्रा. लिमिटेड यांच्या बरोबर केलेला प्रकल्पाचा सवलत करारनामा दोन्ही पक्षाच्या सहमतीने संपुष्टात आणण्यात आला.

मुंबईतील वाहतूकीची कोंडी कमी करण्यासाठी मुंबई मेट्रो बृहत् आराखडयातील मेट्रो मार्गांची लवकरात लवकर अंमलबजावणी करण्यासाठी मुंबई मेट्रो मार्गांची पुढील ३ ते ४ वर्षात खाली नमूद केलेल्या ११८ कि.मी. लांबीच्या उन्नत मेट्रो रेल्वे मार्गाची त्वरीत अंमलबजावणी करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ठरविले आहे.

| अ. क्र. | मार्गिकांची नावे | लांबी |
|---|---|---|
| १ | • दहिसर (प) - डी.एन.नगर-वांद्रे | २७ कि.मी |
| | • वांद्रे - मानखुर्द | १३ कि.मी |
| २ | • वडाळा-घाटकोपर-ठाणे -कासारवडवली | २२ कि.मी + १० कि.मी |
| | • वडाळा - मुख्य डाक कार्यालय (GPO)- आर.ए. किडवाई रोड मार्ग | ८ कि.मी |
| ३ | • दहिसर (पू) - अंधेरी (पू) | १८ कि.मी |
| | • अंधेरी (पू) - वांद्रे (पू) | ९ कि.मी |
| ४ | • जोगेश्वरी - विक्रोळी लिंक रोड | ११ कि.मी |
| **एकूण** | | **११८ कि.मी** |

उपरोक्त मेट्रो रेल्वे मार्गांची त्वरीत अंमलबजावणी करण्यासाठी प्रस्तावित मेट्रो रेल्वे प्रकल्पाचा बृहत आराखडयामधील रेल्वे मार्गांची तपासणी पुनर्विलोकन, अद्ययावतीकरण व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन घेण्यासाठी दिल्ली मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन मर्यादित (DMRC) यांची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत (एमएमआरडीए) सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यानुसार दिल्ली मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने मुंबई मेट्रो लाईन-२ दहिसर-चारकोप-वांद्रे-मानखुर्द मेट्रो मार्ग टप्पा १ दहिसर (पू) - डी.एन.नगर या मार्गिकेवर मेट्रो रेल्वे प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास सादर केला असून व प्राधिकरणाने त्यास मंजूरी देऊन उपरोक्त मार्गिकांची त्वरीत अंमलबजावणी करावयाच्या ११८ कि.मी. लांबीच्या मेट्रो रेल्वे मार्गिकांना तत्वत: मान्यतेसह मुंबई मेट्रो लाईन-२ च्या टप्पा १ दहिसर (पू) - डी.एन.नगर या मेट्रो रेल्वे मार्गिकेस मान्यता देण्यासाठी सदर प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सादर केला आहे.

राज्य शासनाकडून सदर प्रकल्पास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या संदर्भात सर्वंकष विचारांती संदर्भ क्र. (२) वरील शासन निर्णय अधिक्रमित करुन शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

असल्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे नाममात्र दराने हस्तांतरित करण्यास तत्वत: मान्यता देण्यात येत आहे.

h) मुंबई मेट्रो मार्ग २ - दहिसर - चारकोप - वांद्रे - मानखुर्द मेट्रो मार्गाचा टप्पा १ - दहिसर (पू) - डी.एन.नगर मेट्रो मार्गाच्या दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांनी सुचित केलेल्या सोबतच्या परिशिष्ट- ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रस्तावित प्रवासी भाडेदरास मान्यता देण्यात येत आहे. सदर भाडे मेट्रो रेल्वे सेवा सुरु करण्यापूर्वी वित्तीय व्यवहार्यता तपासून गरज भासल्यास त्यामध्ये आवश्यक बदल करण्याचे अधिकार वापरण्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

i) नागपूर मेट्रो रेलवे प्रकल्प तसेच मुंबई मेट्रो लाईन-३ या प्रकल्पाकरिता केंद्रशासनाने केंद्रीय कराच्या ५०% रक्कम केंद्रशासन दुय्यम कर्ज स्वरुपात उपलब्ध करुन देत आहे. त्या धर्तीवर सदर मेट्रो प्रकल्पासाठी केंद्र शासनाचा कर/शुल्काच्या ५०% हिस्सा केंद्रशानानकडून रु.२९२.५० कोटी दुय्यम कर्ज घेण्याचे प्रस्तावित असून सदर कर्ज सहाय्य मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

j) सदर मेट्रो प्रकल्पासाठी केंद्र शासनाचा कर/शुल्काच्या ५०% हिस्साकरीता व राज्यस्तरीय /स्थानिक कर यावरील खर्चासाठी राज्य शासनामार्फत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला एकूण रु. ७५७.५० कोटी दुय्यम कर्ज देण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रकल्पाच्या मुख्य कर्जाची परतफेड झाल्यानंतर सदरचे दुय्यम कर्जसहाय्याची परतफेड व्याजासहीत संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्था /एमएमआरडीए यांनी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

k) सदर प्रकल्पासाठी कायमस्वरुपी/तात्पुरत्या आवश्यक असलेल्या शासकीय / निमशासकीय /स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या जमिनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे नाममात्र दराने भाडेतत्वावर हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

l) सदर प्रकल्पासाठी खाजगी जमिनीचे संपादन तसेच पुनर्वसन आणि पुनर्वसाहत यावरील खर्च मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने करावयाचा आहे. त्यानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास निदेश देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

m) सदर मेट्रो मार्गालगतच्या शासकीय व निमशासकीय संस्थांच्या मोकळया जागांचा मेट्रो रेल्वे बांधकाम कालावधी दरम्यान तात्पुरता वापर करण्यासाठी व सदर मोकळया जागा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे सुपूर्द करण्यास परवानगी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

n) सदर प्रकल्प वेळेवर पूर्ण करण्यासाठी मेट्रो रेल्वे स्थानक सुविधांकरीता व तसेच कारडेपोकरीता आवश्यक असलेल्या खाजगी जमिनी मेट्रो रेल्वे अधिनियम, २००९/ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४/महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ /नविन केंद्रीय भूसंपादन व पुनर्वसन व पुनर्वसाहत अधिनियम, २०१३ अंतर्गत संपादन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

o) मेट्रो रेल्वे स्थानक व कारडेपोच्या जागेचा व्यावसायिक वापर करण्यास परवानगी देणे व त्यानुसार सदर जमिनीचा वाणिज्यिक विकास करण्याचे अधिकार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

p) सदर प्रकल्पांतर्गत प्रकल्पबाधितांचे (PAP) पुनर्वसन व पुनर्वसाहत बहूपक्षीय /आंतरराष्ट्रीय बँक किंवा इतर आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थेने सहमती दर्शविल्याप्रमाणे "मुंबई नागरी परिवहन प्रकल्प पुनर्वसन व पुनर्वसाहत धोरण (MUTP -R & R Policy)" नुसार करण्याकरीता मान्यता देण्यात येत आहे.

q) मुंबई मेट्रो मार्ग २ - दहिसर - चारकोप - वांद्रे - मानखुर्द मेट्रो मार्गाचा टप्पा १ - दहिसर (पू) - डी.एन.नगर हा प्रकल्प **"निकडीचा सार्वजनिक प्रकल्प"** व **"महत्वपूर्ण नागरी परिवहन प्रकल्प"** म्हणून घोषित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

r) सोबतच्या परिशिष्ट-४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे **"समर्पित नागरी परिवहन निधी"** च्या उभारणीस आणि इतर स्रोतामधुन उपलब्ध झालेला निधी **"समर्पित नागरी परिवहन निधी"** मध्ये जमा करुन तो निधी सदर प्रकल्पासाठी, भविष्यात येणाऱ्या पायाभुत सुविधा प्रकल्पाच्या अंमलबजावणी करण्यासाठी तसेच कार्य व देखभाल (O&M) इ. साठी प्राधिकरणास वापरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

s) सदर प्रकल्पाच्या प्रभाव क्षेत्राकरीता **मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास** महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ नुसार **"विशेष नियोजन प्राधिकरण"** म्हणून नियुक्त करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

t) सदर मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी करण्याकरीता नियुक्त करण्यात येणारे मनुष्यबळ जसे की, तांत्रिक, सहाय्यक व व्यवस्थापकीय अधिकारी / कर्मचारी वर्ग तसेच भ्रमणध्वनी, फर्निचर, वाहन इ. साठी लागणारा एकूण प्रशासकीय व व्यवस्थापकीय खर्च हा सर्व मेट्रो प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या २% पेक्षा जास्त नसावा, या अटीस अधिन राहून सदर खर्च मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

u) महाराष्ट्र विद्युत नियामक मंडळाकडून मेट्रो प्रकल्पांकरीता सवलतीच्या दरात 'ना नफा ना तोटा' या त्त्वावर वीज उपलब्ध करुन देण्याची शासनामार्फत शिफारस करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

v) मुंबई मेट्रो मार्ग २ - दहिसर - चारकोप - वांद्रे - मानखुर्द मेट्रो मार्गाचा टप्पा १ - दहिसर (पू) - डी.एन.नगर या मेट्रो मार्गाची अंमलबजावणी **'मेट्रो कायदा २००९ (सुधारित)'** नुसार करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

w) मुंबई मेट्रो मार्ग २ - दहिसर - चारकोप - वांद्रे - मानखुर्द मेट्रो मार्गाचा टप्पा १ - दहिसर (पू) - डी.एन.नगर या मार्गाकरीता कार्य आणि देखभालच्या (O&M) दरम्यान महाराष्ट्र स्टेट सेक्युरिटी कॉर्पोरेशन यांच्या मार्फत सुरक्षा पुरविण्यात येईल तथापि सदर सुरक्षिततेसाठी तैनात करावयाचे सुरक्षारक्षक, आवश्यक साहीत्य (जसे बंदुक, अश्रुधूर, श्वान पथक) इत्यादींचा पुरवठा आणि यांवर

**शासन निर्णय :-**

१. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने त्वरीत अमंलबजावणी करण्यासाठी प्रस्तावित केलेल्या ११८ कि.मी. उन्नत मेट्रो रेल्वे मार्गांची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत अंमलबजावणी करण्यास तसेच मुंबई मेट्रो लाईन-२ या मेट्रो रेल्वे प्रकल्पांतर्गत "दहिसर-चारकोप-वांद्रे-मानखुर्द मेट्रो मार्ग टप्पा १ दहिसर (पू) - डी.एन.नगर" या मेट्रो मार्गिकेच्या प्रकल्पास पुढील परिच्छेदात नमूद केलेल्या अटीच्या अधीन खालील प्रमाणे राज्य शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे

a) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने त्वरीत अमंलबजावणी करण्यासाठी प्रस्तावित केल्या प्रमाणे एकूण ११८ कि.मी. उन्नत मेट्रो रेल्वे मार्गांची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

b) मुंबई मेट्रो मार्ग २ - दहिसर - चारकोप - वांद्रे - मानखुर्द मेट्रो मार्गाचा टप्पा १ § भाग दहिसर (पू) - डी.एन.नगर या प्रकल्पाच्या सोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये तपशील नमूद केल्या प्रमाणे प्रकल्प पूर्णत्वाच्या एकूण रु. ६४१० कोटी किंमतीस मान्यता देण्यात येत आहे.

c) सोबतच्या परिशिष्ट-२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे राज्यशासन/केंद्र शासन/मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण प्राधिकरणातर्फे समभाग भागभांडवल तसेच बाहय कर्ज सहाय्य उभारुन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

d) सदर प्रकल्प द्विपक्षीय/बहुपक्षीय/आंतरराष्ट्रीय/आंतरदेशीय अशा विविध वित्तीय संस्थांकडून कर्ज घेऊन त्याच्या मुद्दलाची परतफेड तसेच व्याजाची परतफेड यांचे दायित्वाची जबाबदारी संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्था/एमएमआरडीए यांची राहील या अटीवर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास कर्ज घेऊन किंवा इतर माध्यमाने राबविण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

e) मुंबई मेट्रो मार्ग २ - दहिसर - चारकोप - वांद्रे - मानखुर्द मेट्रो मार्गाचा टप्पा १ -दहिसर (पू) - डी.एन.नगर या प्रकल्पाची अंमलबजावणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

f) सदर प्रकल्पासाठी आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था यांच्याकडून कर्ज घेणेसाठी केंद्र सरकार आणि आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था यांच्याबरोबर समन्वय साधणे आणि प्रकल्प अंमलबजावणीच्या पुढील सर्व कार्यवाहीकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

g) मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या दुरुस्ती व देखभाल आगारासाठी मालवणी व उपलब्धतेनुसार व आवश्यकतेप्रमाणे इतर जमीन वापरात आवश्यक ते बदल करुन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे नाममात्र दराने भाडेतत्वावर हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या दुरुस्ती व देखभाल डेपोसाठी मालवणी येथील जमीन व उपलब्धतेनुसार व आवश्यकतेप्रमाणे इतर जागा /महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये जमीन वापर फेरबदल करुन हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. प्रकल्पासाठी निधी उभारण्याच्या दृष्टीने अतिरिक्त जमीन रहिवाशी /वाणिज्यिक विकास करण्यासाठी उपलब्ध होत

येणारा खर्च हा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने करण्याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास निदेश देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

x) प्रस्तावित मेट्रो मार्गिकेमध्ये काही बस डेपो/स्टँड तसेच गोरेगाव, ओशिवरे बस डेपो/स्टँड हया बेस्टच्या मालकी हक्काच्याअसलेल्या तसेच जेथे मेट्रोचे बेस्ट सेवेशी एकात्मीकरण आणि बस डेपोचे वाणिज्यिक विकास करणे शक्य आहे अशा बेस्ट प्रशासनाने यापुर्वीच मान्यता दिलेल्या जमिनीव्दारे निधी उभारणे आणि विभागणी याबाबतची यंत्रणा तयार करण्यास करण्यास तत्वत: मान्यता देण्यात येत आहे.

२. खालील अटींच्या अधीन उपरोक्त मान्यता राहील .

a) सदर प्रकल्प द्विपक्षीय/बहुपक्षीय/आंतरराष्ट्रीय/आंतरदेशीय अशा विविध वित्तीय संस्थांकडून कर्ज घेऊन त्याच्या मुद्दलाची परतफेड तसेच व्याजाची परतफेड याचा जबाबदारी संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्था/एमएमआरडीए यांची राहील त्यामुळे शासनावर अतिरिक्त भार येणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी.

b) सदर प्रकल्पास दिल्या जाणाऱ्या दुय्यम कर्जाची परतफेड ही मुख्य कर्जाची परतफेड झाल्यानंतर संबंधित संस्थेने करावयाची आहे. सदरचे कर्जसहाय्याची परतफेड व्याजासहीत संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्था /एमएमआरडीए यांनी करावयाची आहे.

c) सदर प्रकल्पासाठी बाह्यसाहित कर्ज शासनास उपलब्ध झाल्यास ते संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्था/एमएमआरडीए यांना उपलब्ध करुन देतांना या कर्जाबाबतच्या अटी व शर्ती, मुद्दलाची परतफेड, व्याजाची परतफेड बाबत दुय्यम कर्ज सहाय्य करारनामा (subsidiary Loan Agreement) करण्याची कार्यवाही करण्यात यावी . सदर कर्ज व त्यावरील व्याज यांचे दायित्वाची जबाबदारी संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्था/एमएमआरडीए यांची राहील.

d) या मार्गाकरिता कार्य आणि देखभालच्या (O&M) दरम्यान सुरक्षिततेसाठी येणारा खर्च मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने करावा.

e) सदर प्रकल्पाच्या अंदाजित किंमत, प्रकल्पामधुन मिळणारा परतावा याकरिता प्रकल्प अहवालात घेण्यात आलेल्या गृहीतकांची कसोशीने तपासणी करणे व ह्या बाबींवर स्वतंत्र अभिप्राय (Second opinion) घेण्याची कार्यवाही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने करावी.

f) सदर मेट्रो प्रकल्पाच्या बांधकाम दरम्यान होणारी वाहतुकीची गैरसोय टाळण्यासाठी वाहतूक पोलीस विभागाशी समन्वय साधुन योग्य तो नाविन्यपुर्ण वाहतूक वळण (Innovative Traffic Diversion) नियोजन / आराखडा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तयार करावा तसेच प्रकल्पाचे बांधकाम कालावधी दरम्यान वाहतूकस कोंडी होणार नाही याची काळजी घ्यावी.

g) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात येणाऱ्या मेट्रो प्रकल्पाच्या कार्य प्रणाली चालन (O&M) साठी एक व्यवस्थापन व्यवस्था मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तयार करावी.

३. हा शासन निर्णय नियोजन विभाग अनौपचारीक संदर्भ क्र.३०३/१४४४, दिनांक १५.०९.२०१५ व वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ क्र.४१३/व्यय-३, दिनांक २९.०९.२०१५ अन्वये प्राप्त अभिप्रायांचा विचार करुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या सांकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१५१०१६१७१०५५१२२५ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Siddharam K Salimath

Digitally signed by Siddharam K Salimath
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Siddharam K Salimath
Date: 2015.10.19 14:09:13 +05'30'

**(एस.के. सालिमठ)**
उप सचिव

**प्रति,**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३) मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४) मा. राज्यमंत्री (नवि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
६) मा. सचिव, शहरी विकास मंत्रालय, भारत सरकार, निर्माण भवन, नवी दिल्ली
७) अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
८) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
९) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१०) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
११) प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१२) प्रधान सचिव (पदुम), कृषी, पशु संवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१३) प्रधान सचिव (परिवहन), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१४) प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१५) प्रधान सचिव (उद्योग) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग , मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

१६) प्रधान सचिव (ऊर्जा) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग , मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१७) प्रधान सचिव गृहनिर्माण विभाग , मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१८) प्रधान सचिव पर्यावरण विभाग , मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१९) सचिव (विशेष प्रकल्प), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२०) सचिव शालेय शिक्षण व क्रीडा विभाग , मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
२१) सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२२) व्यवस्थापकीय संचालक, मंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रायव्हेट लिमिटेड.
२३) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२४) पोलिस आयुक्त, मुंबई.
२५) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
२६) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
२७) व्यवस्थापकीय संचालक, सिडको, मुंबई.
२८) आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, वरळी, मुंबई.
२९) जिल्हाधिकारी मुंबई शहर/मुंबई उपनगरे, मुंबई.
३०) सह पोलिस आयुक्त वाहतूक, मुंबई
३१) व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. मुंबई.
३२) महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, मुंबई.
३३) महाव्यवस्थापक, पश्चिम रेल्वे, मुंबई.
३४) महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम, (बेस्ट), मुंबई.
३५) सह सचिव, नगर रचना, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३६) संचालक, नगर रचना, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पुणे.
३७) उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३८) कार्यासन अधिकारी (नवि-२१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३९) निवड नस्ती (नवि-७).

(नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३१५/प्र.क्र.११३/नवि-७, दिनांक - १७ ऑक्टोबर २०१५ चे सहपत्र)

# परिशिष्ट-१

## मुंबई मेट्रो रेल्वे मार्ग २ (दहिसर - चारकोप - वांद्रे - मानखुर्द मेट्रो मार्ग) टप्पा १ - दहिसर (पू) - डी.एन.नगर मेट्रो रेल्वे प्रकल्पाचा तपशिल

| अ.क्र. | तपशील | |
|---|---|---|
| १ | मार्गाची लांबी | १८.६० कि.मी. |
| २ | एकूण स्थानके | १७ |
| ३ | स्टँन्डर्ड गेज | १४३५ मि.मी. |
| ४ | गाडयांचे वेळापत्रक | वर्ष २०२१ - प्रति ४.५ मिनिट<br>वर्ष २०३१ - प्रति ३.५ मिनिट |
| ५ | प्रस्तावित कार डेपो (RSS धरुन) | १९.५९ हेक्टर<br>(नगर भूमापन क्रमांक-६अ, मालवणी येथे) |
| ६ | इतर लागणारी जमीन (अंदाजित) कार डेपो वगळून | खाजगी - ०.५० हेक्टर<br>शासकीय - १.६५ हेक्टर |
| ७ | प्रकल्प राबविण्याचा कालावधी | ऑक्टोबर २०१५ ते मार्च २०१९<br>(एकूण४२ महिने) |
| ८ | तात्पुरती लागणारी शासकीय भाडेतत्वावरची जमीन (बांधकाम कालावधीच्या दरम्यान) | ८.०० हेक्टर |
| ९ | एकूण खर्च<br>(जमिनीची किंमत वगळून व सर्व करांसहीत जुलै २०१५ च्या भावपातळी नुसार) | रु. ४३८८ कोटी |
| १० | मूळ किंमत<br>(जमिनीची किंमत, पुनर्वसन व पुनर्वसाहत धरुन व सर्व करांसहीत जुलै २०१५ च्या भावपातळी नुसार) | रु. ४९९४ कोटी |

| अ.क्र. | तपशील | |
|---|---|---|
| ११ | प्रकल्प पूर्णत्वाची किंमत (केंद्र शासनाचा कर धरुन आणि राज्य शासनाचा कर वगळून) | रु. ५९२५ कोटी |
| १२ | प्रकल्प पूर्णत्वाची किंमत (सर्व करांसहीत व जमीन व पुनर्वसनाच्या खर्चासहीत) | रु. ६३९० कोटी |
| १३ | प्रकल्प पूर्णत्वाची किंमत (सर्व करांसहीत व जमीन व पुनर्वसनाच्या खर्च तसेच बांधकाम कालावधी दरम्यानचे व्याज यासह) | रु. ६४१० कोटी |
| १४ | EIRR (Economic Internal Rate of Return) | २२.५२ % |
| १५ | FIRR (Financial Internal Rate of Return) with PD | ८.६५ % |
| १६ | प्रवासी क्षमता (६ डब्यांची गाडी) | १) ६ प्रवासी प्रतिवर्ग मीटर प्रमाणे - १७५६ प्रवासी क्षमता.<br>२) ८ प्रवासी प्रतिवर्ग मीटर प्रमाणे - २२४४ प्रवासी क्षमता. |
| १७ | प्रतिताशी प्रतिदिशा प्रवासी संख्या (PHPDT) * | वर्ष २०२१ - ३५,१४२<br>वर्ष २०३१ - ३८,५०९ |
| १८ | दैनंदिन प्रवासी संख्या * | वर्ष २०२१-२२ - १२.९८ लाख<br>वर्ष २०३१-३२ - १६.५८ लाख |

* उपरोक्त अंदाजीत केलेली प्रतिताशी प्रतिदिशा प्रवासी संख्या आणि दैनंदिन प्रवासी संख्या ही संपूर्ण मार्गासाठी आहे.

## परिशिष्ट- २

**मुंबई मेट्रो मार्ग २ - दहिसर - चारकोप - वांद्रे - मानखुर्द मेट्रो मार्गाचा टप्पा १ -दहिसर (पू) - डी.एन.नगर या प्रकल्पामध्ये राज्य शासन/केंद्र शासन/एमएमआरडीए आर्थिक भागीदारी**

| अ.क्र | आर्थिक सहभागी संस्था | तपशील | रक्कम रु कोटीत |
|---|---|---|---|
| १ | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा राज्य शासनाच्या वतीने समभाग | राज्य शासनाच्यावतीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा समभाग | १८९२.०० |
| २ | राज्य शासन-दुय्यम कर्ज | अ) केंद्रीय करांकरीता रु.५८५ कोटीच्या ५०% = रु.२९२.५० कोटी | ७५७.५० |
| | | ब) राज्य स्तरीय /स्थानिक करांकरीता रु.४६५.०० कोटी | |
| ३ | केंद्र शासन दुय्यम कर्ज | केंद्रीय करांकरीता रु.५८५ कोटीच्या ५०% = रु.२९२.५० कोटी | २९२.५० |
| ४ | राज्य शासन सहाय्य (शासकीय जमीन नाममात्रदराने प्रकल्पासाठी उपलब्धकरणे) | कारडेपोच्या जमिनीची व इतर उपलब्ध असलेल्या जमिनीची किंमत - (बाजारभावानुसार२०१५ च्या दराने किंमत शासकीय जमीन रु ४७३ कोटी खाजगी जमीन रु ५०.०० कोटी) | ६६५.०० |
| ५ | कर्ज सहाय्य | बाहय सहाय्य/बहूक्षीय/व्दिपक्षीय/ आंतरराष्ट्रीय कर्ज सहाय्य | २८०३.०० |
| | **एकूण** | | **६४१०.००** |

टिप - (१) सदर प्रकल्पामुळे होणाऱ्या मालमत्ता विकास / परिणाम शुल्क / सुधारणाशुल्कापोटी अपेक्षित निधी (ImpactFee)/ Betterment Charges Tax/विकास कर याव्दारे रु. ५०० कोटी जमा होणे अपेक्षीत आहे

२) उपरोक्त नाममात्र दराने द्यावयाची शासकीय जमिनी (बाजारभावानुसार२०१५ च्या दराने शासकीय जमीन किंमत रु ४७३ कोटी) ही सदर प्रकल्पातील राज्यशासनाच्या वतीने जमीन स्वरुपातील सहाय्य म्हणून राहील. तसेच खाजगी जमिन (बाजारभावानुसार२०१५ च्या दराने खाजगी जमीन रु ५०.०० कोटी) ही प्राधिकरणाने त्यांच्या निधीतून संपादन करावयाची आहे.)

## परिशिष्ट- ३

मुंबई मेट्रो मार्ग २ - दहिसर - चारकोप - वांद्रे - मानखुर्द मेट्रो मार्गाचा टप्पा १ -दहिसर (पू) - डी.एन.नगर या मार्गाचे सन २०१९-२०२० करीता प्रस्तावित सुरुवातीचे भाडेदर तक्ता

| अंतर (कि.मी.) | ० - ३ | ३ - १२ | १२ -> |
|---|---|---|---|
| भाडे (रु.) | १० | २० | ३० |

वर उल्लेखित केलेले भाडे मेट्रो सुरु करण्यापूर्वी वित्तीय व्यवहार्यता तपासून गरज भासल्यास त्यामध्ये आवश्यक बदल करण्याचे अधिकार सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणी करणाऱ्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास राहतील.

## परिशिष्ट- ४

मुंबई मेट्रो प्रकल्प मुंबई मेट्रो मार्ग २ - दहिसर - चारकोप - वांद्रे - मानखुर्द मेट्रो मार्गाच्या टप्पा १ -दहिसर (पू) -डी.एन.नगर राबविण्याकरीता लागणारा निधी उभारण्याचे विविध स्त्रोत-

अ. सदर मेट्रो मार्गिकांच्या दोन्ही बाजूस ५०० मी. अंतरापर्यंत येणाऱ्या जमिनीवर, अधिमूल्य आकारुन अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक (एफ.एस.आय.) देण्याची तरतूद विकास नियंत्रण नियमावलीतकरुन त्यानुसार अधिमूल्याची रक्कम संबंधित क्षेत्रातील नियोजन प्राधिकरणाने वसूल करणे व अशा वाढीव चटईक्षेत्र निर्देशांकापोटी वसूल केलेल्या अधिमूल्याच्या रक्कमेपैकी ५०% रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे वर्ग करणे.

ब. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतूदीनुसार आकारण्यात येणारे विकास शुल्क शासन अधिसूचित करेल, असे महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प राबविण्यात येणाऱ्या शहरात १००% पर्यंत वाढ करुन आकारण्याविषयी कायद्यात तरतूद करणे व त्यानुसार वसूल होणारी वाढीव रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे वर्ग करणे.

क. शासनाने बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प राबविण्याचे अधिसूचित केल्यास, महानगरपालिका क्षेत्रात मुंबई मुद्रांकअधिनियम, १९५८ अन्वये स्थावर मालमत्तेचे अनुक्रमे विक्री, देणगी व फलोपभोग गहाण यावरील संलेखावर बसवायच्या मुद्रांक शुल्कासोबतच जमिनी व इतर स्थावर मालमत्तेचे विक्री किंवा देणगीच्याबाबतीत अशारितीने स्थित असलेल्या मालमत्तेच्या मुल्यांवर व फलोपभोग गहाणाच्या संलेखाच्या बाबतीत संलेखात मांडण्यात आलेल्या संलेखाव्दारे सुरक्षित रक्कमेवर १% अधिभार लावण्याची तरतूद मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मध्ये करुन अशा प्रत्यक्ष जमिनी व इतर स्थावर मालमत्तेचे अनुक्रमे विक्री, देणगी व फलोपभोग गहाण संलेखाच्या नोंदणीच्या वेळी सदर अधिभाराची रक्कम संबंधित जिल्हा उपनिबंधकांनी / दुय्यम निबंधकांनी वसूल करणे व शासनाने या माध्यमातून वसूल झालेल्या रक्कमे एवढे अनुदान दरवर्षी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास वर्ग करणे.

ड. मेट्रो कार डेपो जागेचे वाणिज्यिक विकसनाव्दारे प्राप्त होणारे उत्पन्न प्रस्तुत प्रकल्पासाठी वापरणे.

इ. मेट्रो रेल्वे स्थानकावरील जाहिरात व पार्किंगपासून मिळणारे उत्पन्न या प्रकल्पासाठी वापरणे इ.

सदर विविध स्त्रोतातून प्राप्त होणारा निधी हा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर एका **"समर्पित नागरी परिवहन निधीमध्ये"** ठेवण्याचे संकल्पित असून त्याचा विनियोग सदर मेट्रो प्रकल्पासाठी राज्यशासनाच्यावतीने लागणाऱ्या समभागाची रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे वर्ग करण्याकरीता तसेच कर्जाच्या परतफेडीसाठी निधी अपूरा पडत असल्यास स्वतंत्र पूरक निधी उभारणी करण्यात यावा.

******